The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्यातील पर्यावरण

**प्रा.डॉ. अशोक गंगाराम अंभोरे**
इतिहास विभाग प्रमुख, तोष्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
सेनगांव ता. सेनगांव जि. हिंगोली.

**प्रस्तावनाः** सजीवांच्या नैसर्गिक परिसरास पर्यावरण असे म्हणतात. पर्यावरणात सजीवात वनस्पती अथवा प्राणी या बरोबरच हवा, वृक्ष, जमीन, पाणी पर्जन्यमान, उंची तापमान यांचा समावेश होतो. सर्व सजीव व त्यांच्या भोवतीचे पर्यावरण एकात्मपणे परस्पराश्रयी असतात. म्हणून पर्यावरणाचे रक्षण करणे ही आपल्या सर्वाची जबाबदारी असून दरवर्षी 4 जून हा पर्यावरण दिन म्हणून जगभर साजरा होत असतो. म्हणून संतानी मानवाचे अध्यात्मीक जीवन समृध्द होण्यासाठी अध्यात्मचिंतन, भक्तितत्व आणि तात्वीक मुल्यांची शिकवण दिली. ज्या देहाच्या आधारे परमात्मा स्वरूपाकडे जायचे आहे तो देह प्रसन्न, निरोगी, सुदृढ आणि आनंदी राहण्यासाठी पर्यावरणाचे मोठेपण संतानी साहित्यात सांगीतले आहे. प्राचीन धर्म ग्रंथात आणि संत साहित्यात प्राचीन काळापासून चालत आलेली कृषीसंस्कृती व तत्ववेत्यांनी सांगीतलेले पंचमहाभूताचे महत्व संतानी सांगीतले आहे. म्हणून आपल्या अवती भेवती पर्यावरणाचे घटक वृक्ष, वल्ली, डोंगर, नदी, फुले, फळे, पशु, पक्षी, वारा, सूर्य, किटक, गायी, गुरे, वने अरण्ये, पाऊस कधी उपमा कधी, रूपक तर कधी सिध्दांत तर कधी दृष्टांत अशा स्वरूपात मराठी वाङ्मयातून साकार झालेली दिसतात.

**शोधनिबंधाची उदिष्टयेः**

1) संत साहित्यातील पर्यावरण विचारांचा अभ्यास करणे.
2) पर्यावरणातील विविध घटकांचा अभ्यास करणे.
3) मानवी जीवनासाठी पर्यावरणाचे महत्व पटवून देणे.

**तथ्य संकलनः** प्रस्तुत शोधनिबंधासाठी, दुय्यम संदर्भ ग्रंथाचा, संत वाङ्मयाचा, प्राचीन धर्मग्रंथाचा अवलंब करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दतीः** संत साहित्यातील पर्यावरण विचार या शोधनिबंधासाठी वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केलेला आहे.

**मानवाकडून प्राण्यांचा व जंगलाचा विनाशः** साधुसंत आणि ऋषी मुनींनी डोंगर, निसर्ग, झाडे, नदी, पशु पक्षी, वने, जंगल अरण्य व वृक्षवल्ली यांचे महत्व ओळखले होते. निसर्गात वावरणारे झाडे आणि पशुपक्षी हेच देवाचे अवतार किंवा वाहने आहेत अशी श्रध्दा होती. एकूण जमीनीपैकी 47 टक्के जमीन ही जंगल व्याप्त आहे. पण गेल्या शतकापासून मानवाने सुधारणेच्या दृष्टीने निसर्गावर विजय मिळवून प्रचंड प्रमाणात जंगलाचा आणि प्राण्याचा विनाश घडवून आणला. आज भारतामध्ये 8 टक्के भागावर जंगल शिल्लक आहे. शिकार, मांस भक्षण, वायु गळतीसारख्या मानव निर्मीत घडून आपल्या मुळे जंगलातील पक्षी, प्राणी, वृक्ष, सरपटणारे प्राण्यांच्या जाती नष्ट होवू लागल्या आहेत. आणि त्याचा परिणाम म्हणून पर्यावरणाचे संतुलन बिघडत चालले आहे त्यामुळे अनियमित पडणारा पाऊस,

वृक्षजीवन ओसाड झाले. पिण्याचा पाण्याचे दुर्मिक्ष निर्माण झाले. दुष्काळ पडला आहे. गावे ओस पडू लागली. त्यामुळे मानवी जीवनावर मोठा परिणाम होत आहे. मानवी जीवन सुव्यवस्थीत जगायचे असेल तर पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन ही आजच्या काळाची नितांत गरज आहे.

**वृक्ष लागवड करणेः** फार पूर्वीपासून पर्यावरणाचे महत्व संतानी ओळखले होते माणसाला जर शुध्द आणि निर्मळ जीवन जगायचे असेल तर वृक्षाची लागवड करणे आवश्यक आहे. मानवी जीवनासाठी अवतीभोवतीचे पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी जो पर्यावरणाचा -हास होत आहे तो थांबविणे गरजेचे आहे. माणसाचा हव्यास कमी झाला पाहिजे. माणसाला राहण्यासाठी सुंदर घरे पाहिजे. पाण्याचे तलाव निर्माण केले पाहिजे, फुलाची झाडे लावली पाहिजे, घराभोवती बाग तयार केली पाहिजे. म्हणून निसर्ग फुलवायचा असेल तर प्रदुषण कमी होणे हे अत्यंत महत्वाचे आहे. वृक्ष लागवडीमुळे पर्यावरण वाढीस खुप उपयोग होतो.

**प्रदुषण थांबविले पाहिजेः** माणूस हा आपल्या स्वार्थासाठी पर्यावरणाचा बेसुमारपणे वापर करतांना दिसत आहे. एक गोष्ट वाईट घडली की तीच्यातून दूस-या वाईट गोष्टीचा जन्म होत असतो. उदा. आज मोठया प्रमाणात प्लास्टीकचा वापर होत आहे. त्यामुळे प्राण्यावर त्याचा वाईट परिणाम होत आहे. शासनाच्या मार्फत पर्यावरणाविषयी जन जागरण केले जात आहे. चुलीची जागा आज गॅसने घेतली आहे. चुलीतून जो धुर येतो त्यामूळे मानवी जीवनावर वाईट परिणाम होते. श्वसनाचे रोग निर्मान होवू शकतात, दृष्टीवर वाईट परिणाम होत असतो. आज वायु प्रदूषण, जलप्रदुषण वाढलेले दिसत आहे. प्रदूषण वाढविणे हे निसर्गाच्या विरूध्द आहे. म्हणून संतानी निसर्गातील प्रत्येक घटकाचे महत्व आपल्या साहित्यातून सांगण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो.

**वृक्ष, पक्षी, जंगले हेच आपले सोयरेः** संत तुकाराम महाराजांनी या निसर्गातील वृक्ष, पक्षी, जंगली व इतर घटकांना आपले सोयरे मानलेले आहे. त्यांच्या सोबत एकांतात रमणे मला खुप आवडते, तया ठिकाणी मनुष्य हा गुणदोषा शिवाय राहू शकतो पृथ्वीचे आसन आणि आकाशाचा मंडप अशा ठिकाणी रममान होवून तेथे क्रीडा विहार करत असतो. तेथे हरीकथेची रूची निर्माण होत असते. त्या ठिकाणी आपला मना बरोबर संवाद होत असतो. आपण जर वृक्ष, वल्ली यांच्या सानिध्यात आलो की आपले मन प्रसन्न राहून चित्त, वृत्ती शांत राहते आणि इतर दोषांपासून मुक्त होतो म्हणून माणसांचे आद्य कर्तव्य कोणते असेल तर वसुंधरा व निसर्ग याचे महत्व समजून घेणे हे अत्यंत महत्वाचे आहे.

**कृषी संस्कृतीचे जतन करणेः** प्राचीन काळापासून भारतात कृषी संस्कृती नांदत आहे. भारत देशाला कृषीप्रधान देश असेही म्हणतात. कृषी हेच भारतीयाच्या उपजीवीकेचे साधन मानले जाते. कृषी संस्कृतीचे वैशिष्टये म्हणजे शेती आणि पशुपालन हे होय. पर्यावरणामुळेच कृषी संस्कृती टिकून राहत असते. ऋग्वेद आणि अथर्ववेदात सुध्दा कृषी विद्या आणि कृषी संस्कृती नांदत होती. ऋग्वेदात तर लोक मजेने बैलांच्या साहयाने शेत नांगर, बैलासह शेतकरी फिरोत पर्जन्य मधून रसाने उदकाने जमीन भिजो, आमच्या ठिकाणी सुख समृध्दीची ठेव निर्मान होवो व शेती समृध्द होवो आणि शेतीला आवश्यक असा पाऊस पडो अशी प्रार्थना केलेली आढळते. शतपथ ब्रम्हाणात तर कृषीकर्माचे महत्व

सांगीतले आहे पाणीतीच्या अष्टाध्यायीत तर कृषी कर्माचे अनेक उल्लेख येतात. अर्थवेदात तर शेतीचे संरक्षण करण्याचे उपाय सांगीतले आहेत.

**पर्यावरणाचे पंचप्राण म्हणजे पंचमहाभूतेः** पृश्वी, आप, तेज, वायु, आकाश या पाच महाभुतांनी प्रकृती निर्माण झाली आहे. ज्ञानेश्वरी ग्रंथात सातव्या अध्यायात विश्वनिर्मितीचे मूळ कारण सांगीतले आहे. परब्रम्ह एक असून बहुत्वाने नराने अशी ईच्छा निर्माण झाली त्यातुनच विश्व बिज निर्माण झाले व त्यातूनच मायाशक्ती निर्माण झाल्याचे सांगीतले आहे. शुध्द आणि निराकार अशा ब्रम्हाच्या ठिकाणी प्रकृती किंवा अहंकार आदी तत्वे किंवा बुध्दसित्वे निर्माण झाली. त्या कल्पना विलासातूनच ब्रम्हांडे विश्वाचे आकाराला आले. भारतीय संस्कृती मध्ये पंचमहाभुतालाच परमेश्वर स्वरूप मानले आहे. म्हणूनच तर सुर्याला सुर्यनारायण पृश्वीला माता, वा-याला वायूदेव, पाण्याला वरूणदेव व अग्नीला अग्नीदेव तर आकाशाला आकाशदेव असे मानले आहे.

**सारांशः** संतानी मानवाचे अध्यात्मीक जीवन समृध्द होण्यासाठी भक्ती, तत्व, तात्वीक मुल्य आणि आत्मचिंतनाचे मुल्य सांगीतले आहे मानवी देह निरोगी, सुदृढ, प्रसन्न व आनंदी राहण्यासाठी पर्यावरणाचे मोठेपण संतानी आपल्या साहित्यातून सांगीतले आहे. आपल्याभोवतीचे निसर्ग सानिध्य हे विपूल, व्यापक व शुध्द असले पाहिजे अशी संताची धारणा होती. एकीकडे कृषी संस्कृती आणि दूसरीकडे तत्ववेत्यांनी सांगीतलेले पंचमहाभूतांचे हे पर्यावरणाच्या दृष्टीने झालेले चिंतन संतानी संत साहित्यात प्रभावीपणे मांडले आहे. मानव जीवन जगतांना किंवा निसर्गात वावरताना आपल्या अवती-भोवती दिसणारे वृक्ष, वल्ली, नदी, फुले, डोंगर, पशु, फळे, वारा, पक्षी, किटक, सुर्य, वन्ये, आरण्ये, गायी, गुरे, पाऊस हे पर्यावरणाचे घटकांना संतानी आपल्या साहित्यातून पर्यावरणाची नवीन दृष्टी दिल्यांचे आपल्या लक्षात येते. म्हणून समृध्द मानवी जीवनासाठी व निसर्गाला जपण्यासाठी पर्यावरणाला जास्तीत जास्त संरक्षण व संवर्धन करणे ही आज काळाची गरज आहे. नाही तर पर्यावरणाचा -हास म्हणजेच मानवी जीवनाचा -हास होऊ शकतो. आज पर्यावरण वाचवा अशा विविध अंगाने मनुष्याला सतर्क केले जात आहे. मानवाला जर वाईट परिणामाला सामोरे जायचे नसेल तर पर्यावरण जतन करण्याची कास धरली पाहिजे. आज संत साहित्यातून सांगीतलेले पर्यावरण विचार महत्वपूर्ण ठरले आहेत.

**संदर्भ ग्रंथः**

1. डॉ. रामचंद्र देखणे संत साहित्यातील पर्यावरण विचार, पदमगंधा प्रकाशन पुणे.
2. http://mrmwikipedia.org. संताचे पर्यावरण विषयक विचार
3. http://maitri2012wordpress.com संताचे पर्यावरण सवंर्धन
4. ज्ञानेश्वरी अध्याय 7
5. संत तुकाराम http://mr.wikipedia.org
6. कौटिल्याचे अर्थशास्त्र http://mrm.wikipedia.org
7. The Rig vedir and Rig Vedir poritey (150 BCE-500 BCE) Book Google. Com Rusprabad 2015.

**संत साहित्यातील पर्यावरण**

**प्रा.डॉ. अशोक गंगाराम अंभोरे**